संरचनेचा नवा मंत्र

२० मार्च २००४ : १० रुपये

# साप्ताहिक सकाळ

## गृहसजावट विशेषांक





साधी जीवनशैली


सौंदर्यपूर्ण अभिरूची







*वस्तू दिसायला जितकी साधी तितकी ती सुंदर अशी व्याख्या आता तयार झाली आहे.*




*फर्निचरमधला नेटकेपणा, सुबकता व रंगसंगती*

अंजली लव्हेकर

# साधं आणि सुंदर

**घर सुंदर दिसावं हे वाटणं स्वाभाविक आहे. मात्र आता सौंदर्याचं खरंखुरं भान येत असल्याचं दिसतं. प्रचंड कोरीव काम केलेल्या, भपकेबाज, अंगावर येणाऱ्या सजावटीचे दिवस संपलेत. साधेपणातील ग्रेस हे आजच्या काळातील सौंदर्याचं विधान ठरू लागलंय. सजावटीतला ढोबळपणा कमी झालाय, त्याचबरोबर उपयुक्ततेची जाणीवही वाढलीय. आधुनिक घरांच्या मांडणीत हा सुटसुटीतपणा चांगला बदल ठरतोय.**

समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीचे एक स्वप्न असते. ते म्हणजे सर्वांगीण कौटुंबिक विकास. या कौटुंबिक विकासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे अंतर्गत सजावटीसह परिपूर्ण असणारे स्वतःचे असे एक घरकुल. भराभर विकसित होत असलेल्या शहरांमधून तयार होणारा समाज हा अतिशय समजूतदार आहे. पैसे मिळविण्याची कला अवगत असलेला हा नवा समाज खरोखरच प्रगल्भ होत आहे. पैसा हाताळण्याची व तो योग्यरीत्या खर्च करण्याची मानसिक क्षमता असलेले हे लोक उपयुक्ततेवर अधिक भर देणारे आहेत. गेल्या दोन दशकातील वास्तुसजावटीतील हा बदल याच समाजाचे प्रतिबिंब आहे.



फॅशनजगतात ज्याप्रमाणे काळानुरूप स्थित्यंतरे होत असतात त्याचप्रमाणे अंतर्गत सजावटीच्या जगातही ट्रेंड्स निर्माण होत असतात. वास्तुशास्त्र व अंतर्गत सजावट या दोन्ही क्षेत्रांतील सध्याचा कल less is more कडे असल्याचा दिसतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर अंतर्गत सजावटीचे क्षेत्र हे Minimalism कडे झुकत चालले आहे. त्याचे पडसाद आपल्याकडेही काही प्रमाणात उमटताना दिसतातच.


ज्याला आपण 'मिनिमलिझम' म्हणतो आहोत, त्याची परिभाषा काय आहे ते आपण पाहू. साधेपणा व उपयुक्तता हे डिझाईनचे महत्त्वाचे पैलू तर सोपे भौमितिक आकार, सरळ रेषा आणि तर्कशुद्धता हे त्याचे इतर काही पैलू. या सर्वांच्या एकत्रित परिणामाला आपण मिनिमलिझम म्हणू शकतो. ज्या घरातील सजावटीतून आपल्याला या सर्व गोष्टी जाणवतील ते घर अतिशय स्वाभाविक असेल.

उदाहरणार्थ एक साधे चौकोनी टेबल आपण मध्यमवर्गीय ते अत्युच्च मध्यमवर्गीय घरांसाठी कशा प्रकारे बनवू शकू? अर्थातच त्यासाठी वापरलेल्या मालावर त्याची किंमत ठरेल. कापड, काच, प्लायवूड, लॅमिनेट, स्टील यापैकी काहीही आपण ज्याच्या त्याच्या बजेटप्रमाणे वापरू शकतो. सौंदर्याचे निकषही आता बदलू लागले आहेत. वस्तू दिसायला जितकी साधी तितकी ती सुंदर अशी व्याख्या आता तयार झाली आहे. अंतर्गत सजावटीमध्ये हा साधेपणा येण्याचे एक कारण असू शकते. ते म्हणजे यंत्रावर मोठ्या प्रमाणात तयार करण्यात आलेले व एकसारखे दिसणारे फर्निचर. कारागिरी व कोरीव काम करणे कमी झाल्यामुळेही असेल; पण लोकांचा कल अशा फर्निचरकडे अधिक दिसतो. अर्थातच


यंत्रावर केलेले असल्यामुळे, एकाच साच्यातून निघणारे हे फर्निचर 'कंटाळवाणे' दिसू शकते; पण त्यातील नेटकेपणा, सुबकता व रंगसंगती हे उत्कृष्ट दर्जाचे मिळू शकतात, ही जमेची बाजू. शिवाय हे फर्निचर माफक दरात मिळू शकते. या साध्या, सरळ फर्निचरचा उपयोग करून घ्यावा. तो त्यामुळे होणारी सोय व त्याची उपयुक्तता यासाठी!

## गरजेप्रमाणे फर्निचर

वास्तू ५०० स्क्वे.फूट असो नाहीतर ५००० स्क्वे. फुटांची असो, जितके इच्छाही असतेच. अशा वस्तू ठेवण्यासाठी एखादे युनिट केले तर ते कसे असावे? असे युनिट बनविताना त्यात ठेवल्या जाणाऱ्या वस्तूला अग्रहक्काने महत्त्व द्यावे लागेल आणि ते युनिट वस्तूच्या तुलनेने कमी महत्त्वाचे असल्याने भडक, लक्ष वेधून घेणारे नसावे. तरच युनिट व वस्तू या दोघांचाही आपापला उद्देश साध्य होईल. याच्या उलट जर आतील वस्तू झाकल्या जाणार असतील व तेच युनिट भिंतीसमोर उभे राहून स्वतःच महत्त्वाचे बनणार असेल, तर मागील भिंत व युनिट यांच्यात काही फक्त कपाट, टेबल, खुर्च्या ठेवल्याने परिपूर्ण होत नाही. सभोवतालची वातावरणनिर्मिती, परिपूर्ण अंतर्गत रचना या पैलूंनाही तितकेच महत्त्व आहे. रंगसंगती योग्य असणेही जरुरीचे आहे. शिवाय हे सर्व पैलू योग्य त्या प्रमाणात वापरणे महत्त्वाचे आहे. जिथे गरज असेल तिथे फॉल्स सिलिंग, संपूर्ण विचार करून ठरविलेली प्रकाशयोजना व घराचे सौंदर्य वाढविणारी रंगसंगती मिळून एक आल्हाददायक, भावनिक नातं जोडणारे असं घरकुल तयार होतं!



फॉल्स सिलिंगही साधेपणानं करता येते



मागील भिंत व युनिट यांच्यामधला सुसंवाद

गरजेचे आहे, तितकेच फर्निचर करून घेण्याचा आमचा प्रयत्न असतो. कोणतीही वस्तू हौस म्हणून करण्यापेक्षा गरज म्हणून करणे महत्त्वाचे आहे. उदा. देशी-विदेशी प्रवास करणारी एखादी व्यक्ती त्या त्या ठिकाणाची आठवण म्हणून काही आकर्षक वस्तू हमखास आणते. येणाऱ्या जाणाऱ्यांनी अशा सुंदर वस्तू कौतुकाने पाहाव्यात ही

सुसंवाद साधला पाहिजे. ज्या भिंतीवर किंवा खोलीत असे युनिट उभे आहे त्याची रंगसंगती, लाईट फिटिंग, फॉल्स सिलिंगचा भाग या इतर घटकांनी आपल्या साधेपणाने या युनिटचे महत्त्व वाढविले पाहिजे.


आपण आतापर्यंत फक्त फर्निचरच्या साधेपणाबद्दल विचार करत होतो. अंतर्गत सजावटीचे इतरही अनेक पैलू आहेत. घर

मागील दोन दशकात आपला देश खूपच प्रगत झाला आहे. या विकासाचा परिणाम म्हणून मध्यमवर्ग झपाट्याने उच्च मध्यमवर्गाकडे झेप घेत आहे. जसजसे आपण (समाज) मध्यमवर्ग ते उच्चमध्यमवर्ग ते अत्युच्चमध्यमवर्ग अशा पायऱ्या वर चढत जातो तसतसा समाज

पान ३५ पाहा

## साधं आणि सुंदर

पान ५५ वरून



मानसिक प्रगल्भता वाढून साध्या पण अभिरुचीपूर्ण राहणीमानाकडे आकर्षिक होतो आहे असे दिसते. अर्थात हे साधे राहणीमान म्हणजे आर्थिकदृष्ट्या कमीपणाने राहणे असा अर्थ नव्हे. अंतर्गत सजावट करताना लक्षात येते, की पैसा योग्य त्या ठिकाणी व योग्य त्या पद्धतीने वापरणे हीच एक कला आहे. उपलब्ध जागेचा इंच न् इंच वापरलाच पाहिजे, ही कल्पना साफ चुकीची आहे. प्रत्येक वस्तूचे सौंदर्य हे तिच्या भोवतालच्या मोकळ्या जागेवर व वातावरणनिर्मितीवर अवलंबून असते. 'व्यक्ति तितक्या प्रकृती' या न्यायाने प्रत्येकाची आवडनिवड जरी वेगळी असली, तरी अंतर्गत सजावटीचे काही नियम व निकष असतात म्हणूनच सर्व घरांची सजावट दिसायला एकसारखी नसली, तरी घरात येणाऱ्या व्यक्तीला प्रसन्न करणारी व त्याच्यातील संवेदना जागी करणारी हवी.

घर लहान असो वा मोठे, आमच्याकडे अंतर्गत सजावटीसाठी मदत घेऊ इच्छिणाऱ्या दहा लोकांपैकी आठ लोक हे घरातील निष्कारण सजावटीपेक्षा उपयुक्ततेवर भर देणारे असतात. घरासाठी आपण नसून आपल्यासाठी घर हे विसरता कामा नये. सध्या विभक्त कुटुंब पद्धतीमुळे 'घर' ही संकल्पना फारच वैयक्तिक झाली आहे. कौटुंबिक गरजा मुळातच थोड्या कमी झाल्या आहेत. त्यातून वस्तूंच्या सहज उपलब्धतेमुळे आता घरात साठवणीच्या वेगळ्या व मोठ्या जागा करण्याची आवश्यकता भासत नाही. थोडक्यात, अंतर्गत सजावटीमध्ये नेटकेपणा व सुटसुटीतपणा आणणारा हा Minimalistic trend मध्यम वर्गाच्या पथ्यावर पडणारा आहे.

### उपयुक्त व नेटकी सजावट

अगदी मोजक्या शब्दात सांगायचे झाले, तर 'मिनिमलिझम' च्या या नवीन ट्रेंडने आपल्याला दिली आहे उपयुक्त व नेटकेपणा असणारी अंतर्गत सजावट. एखादे उदाहरण घ्यायचे झाले, तर साधे रोजच्या जेवणाचे डायनिंग टेबल व खुर्च्या घेतल्या तर पूर्वी लोक बजेट थोडे जास्त वाढवून कोरीव काम असलेल्या खुर्च्या पसंत करीत व घेत असत. क्वचित प्रसंगी लहान घरातून या विसंगतही दिसत असत; पण आता लोकांचा कल कोणतेही कोरीव काम नसलेल्या खुर्च्या घेण्याकडे असल्याचे स्पष्ट दिसते. अगदी रोजच्या वर्तमानपत्रातल्या फर्निचरच्या जाहिराती पाहिल्या तरी तुमच्या हे लक्षात येईल.

### सौंदर्याचं भान

भिंतीवरील वा डायनिंग टेबलवरील सुरेख आर्टवर्कने लक्ष वेधून घ्यायला हवे असेल तर त्याभोवतीची फ्रेमही साधी, कोरीव काम व चकचकीतपणा नसलेली हवी. ती साध्या पुठ्याची, लाकडाची किंवा स्टीलची असो.

घरातील इतर फर्निचरही असेच कौटुंबिक दैनंदिनाला शोभेसं व उपयुक्त हवं. दैनंदिन व्यवहारातील हिस्सा बनून तुमच्या घरातील अंतर्गत सजावटीने तुमच्याशी सुसंवाद साधला, तरच ती सुसंगत सजावट होऊ शकते.

घरातील छताला फॉल्स सीलिंग हे अनेक कारणांसाठी केले जाते. घरातील वेडेवाकडे कानेकोपरे झाकण्यासाठी, एसी व इलेक्ट्रिक पाईप झाकण्यासाठी, हिट इन्सुलेशन किंवा निव्वळ सौंदर्यदृष्टीसाठी. वरील कोणत्याही कारणासाठी फॉल्स सीलिंग सुखद प्रकाशयोजना केले तरी ते अतिकोरीव कामाने अंगावर आल्यासारखे वाटू शकते. आपली घरे तशी कमी उंचीची असल्या कारणाने आवश्यक असेल तरच व तेवढेच फॉल्स सीलिंग केले तर ते घराची शोभा अधिक वाढवू शकेल. त्यातही साधे भौमितिक आकाराचे कटआऊट लाईट व पंख्यासाठी घेतले तर ते सुबक दिसते. लहान घरांच्या बाबतीत फ्लोअरिंगबद्दल ही हेच गणित आपण मांडू शकतो. तुकडे तुकडे जोडून किचकट फ्लोअरिंग डिझाईन बनवण्याचे दिवस आता संपल्यात जमा आहे. नक्षीकाम असलेली जमीन आता घराघरातून नाहीशी झाली आहे. मोठ्या व तात्काळ स्वच्छ होणाऱ्या फ्लोअरचा जमाना आला आहे. अनेक रंगातून मिळणाऱ्या सिरॅमिक वा पोर्सेलिंग फ्लोअर टाईल्स ही नुसती फॅशन नसून तर काळाची गरजही आहे.

अंतर्गत सजावटीच्या या क्षेत्रात आम्ही बरेच वर्ष काम करत आहोत. आमचा स्वतःचा कल पूर्वीपासूनच साध्या पण उच्च अभिरुचीपूर्ण काम करण्याकडे आहे. साधे फर्निचर, फ्लोअरिंग, फॉल्स सीलिंग, सुखद प्रकाशयोजना व बटबटीतपणा टाळून केलेली रंगसंगती यांना मिळणारा वाढता प्रतिसाद पाहिला तर लक्षात येते, की भपकेबाजपणापेक्षा आरामदायी जीवनशैली लोक अधिक पत्करू लागले आहेत. ■


'लक्षात ठेवा' आरोग्याचा राजमार्ग तुमच्या पोटातून जातो

वैद्य पाटणकर आयुर्वेदिक काढा



एक कडवट सत्य

कोष्टशुध्दी, अपचन, स्ट्रेस, उष्णता, अंगावरचे रॅश, रक्तातली अशुद्ध द्रव्ये, सांधेदुखी, कावीळ तारुण्यपीटिका... या सगळ्यांवर एकच गुणकारी इलाज.

वैद्य पाटणकर फार्मसी प्रा. लि. वरळी, मुंबई-२५.